**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशातला नक्षलवाद लवकरच संपुष्टात आणण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही.**
2. **देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना देणाऱ्या GST 2.0 सुधारणा यशस्वी ठरल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं प्रतिपादन.**
3. **सर्वत्र धनत्रयोदशीचा उत्साह, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्या जनतेला शुभेच्छा.**
4. **महाज्योती'च्या नागपुरातील भव्य इमारतीचे उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन.**

---------------------------------------------------

पंतप्रधान नरेंद्र मोदी

देशातला नक्षलवाद लवकरच संपुष्टात आणणार असल्याची ग्वाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. ते काल नवी दिल्ली इथं एका खासगी वृत्तसंस्थेनं आयोजित केलेल्या जागतिक शिखर परिषदेत बोलत होते. आपल्या सरकारनं सुरुवातीपासूनच दिशाभूल झालेल्या तरुणांना मुख्य प्रवाहात परत आणण्यासाठी पूर्ण संवेदनशीलतेनं काम केलं आहे. त्यामुळेच आज देशात नक्षलवादानं प्रभावीत जिल्ह्यांची संख्या केवळ ११ वर आली असून, केवळ मागच्या काही दिवसांतच ३०३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी - २४ सेकंद)***

***11 वर्ष पहले तक देश के सव्वा सौ जिले 125 से ज्यादा माओवादी आतंक से प्रभावित थे और साथियों आज ये संख्या सिर्फ 11 जिलों तक सिमट गई है। आप जानते होंगे कितना कुछ करना पड़ा होगा और उसमें भी 11 में भी अब सिर्फ तीन जिले ही ऐसे बचे हैं, जो सबसे अधिक माओवादी आतंक की चपेट में हैं।***

आज संपूर्ण जग भारताकडे एक विश्वासार्ह, जबाबदार आणि लवचिक भागीदार म्हणून पाहत असल्याचंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. आज देशात इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्माण, ऑटोमोबाईल, मोबाईल अशा प्रत्येक क्षेत्रात गुंतवणुकीची लाट

उसळली असल्याचं त्यांनी आज भारतात येत आहे. ही गुंतवणूक भारताला जागतिक पुरवठा साखळीचे केंद्रस्थान बनवायला मदतीची ठरणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------------------

जीएसटी

देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा चालना देणाऱ्या GST 2.0 सुधारणा यशस्वी ठरल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले. या सुधारणा राबवल्यानंतर इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल आणि उपभोग्य वस्तू क्षेत्रात विक्रमी विक्री नोंदवली गेली असून सणासुदीच्या काळात बाजारपेठेत चैतन्य निर्माण झाल्याचे त्या म्हणाल्या. त्या आज नवी दिल्ली इथं आयोजित "GST बचत उत्सव" या संयुक्त पत्रकार परिषदेत माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत बोलत होत्या. सीतारामन म्हणाल्या की, GST दर कपातीचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.

***(होल्ड बाइट - केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन)***

***The prices are reduced meaning the tax benefit is reaching the end consumer. 54 items, I am not going to read each one of them out and even as we say 54 items, you know from 12 to 5 the rate reduction has happened and from 28 to 18 rate reduction has happened on largely most of the goods. But in some cases one or two went this way or that way. But 54 such daily use items we have been closely monitoring.***

या प्रसंगी अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, या वर्षीच्या नवरात्रीत विक्रमी विक्री झाली असून इलेक्ट्रॉनिक्स विक्रीत तब्बल २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यांनी म्हटले की, GST सुधारणांमुळे अन्नधान्याच्या किमती कमी होत आहेत आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रालाही याचा थेट फायदा होत आहे.

***(होल्ड बाइट - केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव 18 सेकंद)***

***नचरल वे मे consumption हर साल बढता है as income grows as country grows because of the GST reforms, consumption will be significantly increasing and quite likely its very likely that the consumption will increase more than 10% this year which means करिब बिस लाख करोंड रुपीज का extra consumption होने की पुरी संभावना है.***

तर वाणिज्य बाबी उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सांगितले की, नवरात्रीच्या काळात वाहन विक्रीत मोठी वाढ झाली असून इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राने सर्व विक्रम मोडले आहेत. जागतिक परिस्थिती अस्थिर असतानाही भारताची अर्थव्यवस्था मजबूत गतीने वाढत आहे आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज वाढवून ६.६ टक्के केला आहे, असे ते म्हणाले.

---------------------------------------------------

राजनाथ सिंह

ब्रम्होस क्षेपणास्त्र हे भारताच्या तिन्ही संरक्षणादलाचा कणा असून अद्ययावत मार्गदर्शक प्रणाली या क्षेपणास्त्रात असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेशातील लखनऊ इथल्या ब्रह्मोस अंतराळ विभागात निर्मित ब्रह्मोस क्षेपणास्त्रांच्या पहिल्या तुकडीला आज राजनाथ सिंह यांनी हिरवा झेंडा दाखवला. त्यावेळी ते बोलत होते, यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची उपस्थिती होती.

---------------------------------------------------

वडेट्टीवार

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मंत्री छगन भुजबळ आणि जरांगे पाटील यांनी आपल्याला लक्ष्य केल्याचा आरोप केला. ब्रह्मपुरी इथं झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. बीडच्या सभेत भुजबळांनी वडेट्टीवार यांच्या वर टीका केली. परंतु टीका करण्यापेक्षा सरकारच्या जीआर विरुद्ध एकत्र येण्यावर त्यांनी भर दिला -

***(होल्ड बाईट - वडेट्टीवार)***

***मूळ प्रश्न होतो सरकारने काढलेला २ सप्टेंबरचा जीआर जो आहे तो रद्द करण्या संदर्भात जो ओबीसीच्या मुळावर आलेला ओबीसी समाजाचा प्रचंड तो जीआरमुळे नुकसान होणार यासंदर्भात त्यांची भूमिका काही मांडत आहे आणि त्यासंदर्भातली आपली लढाई असली तरी त्यांची असू द्या की आमची असू द्या.***

सरकारने २ सप्टेंबरला काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाचे नुकसान होत असून, तो निर्णय रद्द करावा अशी मागणी त्यांनी केली. राज्यातील खरी समस्यांवरून लक्ष हटवण्यासाठी सरकार गैरसमज निर्माण करत असल्याची टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

---------------------------------------------------

धनत्रयोदशी

देशात धनत्रयोदशीच्या पावन पर्वाने आज दिवाळी सणाला सुरूवात झाली.  या दिवशी धन्वंतरी, कुबेर आणि माता लक्ष्मीची पुजा केली जाते. तसंच सोन्या-चांदीची खरेदीही केली जाते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी धनत्रयोदशीनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. सर्वांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि आरोग्य राहो अशी प्रार्थना  प्रधानमंत्र्यांनी केली. नागपुरात आज बाजारपेठेत गर्दी बघायला मिळाली, पूजा साहित्यासह नवीन वस्तूंची खरेदी, दागिने याकडे लोकांचा विशेष काळ आहे. आयुर्वेदिक संस्था संघटना आज धन्वंतरी पूजन करत आहे. चंद्रपुरात आज स्नेहांकित दिवाळी पहाटचं आयोजन करण्यात आलं होतं. अनेक वर्षांची परंपरा असलेल्या या कार्यक्रमाचा आज धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर रसिक प्रेक्षकांनी आस्वाद घेतला. पार्श्वगायिका सई टेंभेकर यांनी आपल्या सुरेल आवाजानं रसिकांना मंत्रमुग्ध केलं. यावेळी हिंदी आणि मराठी गाण्यांची मेजवानी चंद्रपुरकरांना अनुभवायला मिळाली.

---------------------------------------------------

नागपूर मेट्रो

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागपूर मेट्रो सेवा मंगळवार, २१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच सुरू राहील. खापरी, प्रजापती नगर, ऑटोमोटिव्ह स्क्वेअर आणि लोकमान्य नगर येथून शेवटची मेट्रो संध्याकाळी ६ वाजता सुटेल असं मेट्रो कडून कळविण्यात आलं आहे.

---------------------------------------------------

पर्यावरण पूरक दीपोत्सव

यवतमाळ जिल्ह्याच्या कळंब तालुक्यातील परसोडी खुर्द इथल्या जिल्हा परिषद प्राथमिक  शाळेतील विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक दीपोत्सव साजरा करण्याची शपथ घेतली. मोठ्या आवाजाच्या फटाक्यामुळे पर्यावरण संतुलन बिघडतं तसंच मानवासह पशुपक्ष्यांवर त्याचे विपरीत परिणाम होतात, याबाबत शिक्षकांनी माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये जागृती केली.

---------------------------------------------------

महाज्योती

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर आता नव्या पर्वात प्रवेश करत आहे. ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यांसाठी ज्ञान आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवणाऱ्या संस्थेच्या ७ मजली प्रशासकीय इमारत आणि १२ मजली प्रशिक्षण केंद्राच्या भव्य वास्तूचे भूमिपूजन उद्या  १९ ऑक्टोबर  रोजी

दुपारी ४.३० वाजता होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी भूषविणार आहेत. कार्यक्रमास मंत्री अतुल सावे, चंद्रशेखर बावनकुळे, ॲड. आशिष जयस्वाल यांच्यासह अनेक खासदार-आमदार उपस्थित राहणार आहेत. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च ११४ कोटी रुपये असून, नागपूर सुधार प्रन्यासमार्फत बांधकाम होणार आहे. संस्थेच्या नव्या इमारतीत प्रशिक्षण, संशोधन व विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

---------------------------------------------------

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर मंडळातर्फे दीपावली आणि छठ पर्वादरम्यान वाढलेल्या प्रवासी संख्येचा विचार करून विशेष होल्डिंग एरिया, नियंत्रण कक्ष आणि सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित करण्यात आली आहे. नागपूर, इतवारी, गोंदिया, डोंगरगड व राजनांदगाव या प्रमुख स्थानकांवर प्रवाशांच्या सोयीसाठी बसण्याची सुविधा, स्वच्छ पिण्याचे पाणी, केटरिंग, तसेच रेल्वे आगमन-विरामाविषयी रिअल-टाइम माहितीची व्यवस्था करण्यात आली आहे.

---------------------------------------------------

प्रभागनिहाय मतदार यादी

नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभागनिहाय मतदार यादी निश्चित मुदतीत तयार करण्यात यावी, असे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. मनपा मुख्यालयात झालेल्या प्रशिक्षण सत्रात त्यांनी अधिकाऱ्यांना समन्वयाने आणि नियोजनपूर्वक कार्य करण्याचे आवाहन केले. डॉ. चौधरी म्हणाले की, मतदार यादी तयार करताना अचूकता आणि जबाबदारी आवश्यक असून कामचुकारपणा सहन केला जाणार नाही. प्रशिक्षणादरम्यान अतिरिक्त आयुक्त विजया बनकर व नोडल अधिकारी सुनिल उईके यांनी मार्गदर्शन केले.

---------------------------------------------------

फिट इंडिया

क्रीडा आणि युवक व्यवहार मंत्रालय तसंच कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमानं, फिट इंडिया या उपक्रमांतर्गत 'आयर्न व्हील्स ऑफ युनिटी' नावानं दोन देशव्यापी सायकलिंग मोहिमा आयोजित करण्यात आल्या आहेत. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यासाठी येत्या

३१ ऑक्टोबरपासून या मोहिमा सुरु होतील. राष्ट्रीय एकता, शारीरिक तंदुरुस्ती आणि लवचिक भारताची भावना देशभरात पोहोचवणं हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

----------------------------------------------------